# श्री व्यंकटेश बालाजी मंदिरात विमानोत्सव



**नाशिक ।** शनिवारी (दि.२८) ब्रह्मोत्सवानिमित्त श्री व्यंकटेश बालाजी मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ ते ९:४५ सामूहिक श्री व्यंकटेश स्तवन तसेच सकाळी ९:४५ वाजता श्री व्यंकटेश प्राकट्य आख्यान तसेच १० वाजेपासून विमानोत्सव, पाद्यपूजा, आरती व ११वाजेपासून श्री व्यंकटेश सहस्रनाम तुलसी अर्चना होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन श्री बालाजी परिवाराने केले आहे.



कापडपेठेतील बालाजी मंदिरात बालाजीवाले घराण्याकडून गेली अनेक शतके पिढ्यान्‌पिढ्या ही परंपरा अविरत सुरू आहे. भाद्रपद एकादशीला व्यंकटेश विमानातून प्रकटले. देवांचा प्राकट्यदिन विमानोत्सव म्हणून साजरा केला जातो. श्री व्यंकटेश बालाजी यांची मुख्य मूर्ती श्रीदेवी आणि भूदेवींसह फुलांनी सजवलेल्या झोपाळ्यात ठेवली जाते. व्यंकटेशांच्या प्रकटण्याचे आख्यान होते. शंखनाद, नगारे, टाळ यांच्या गजरात देवांचे प्राकट्य साजरे होते. यांनतर तिमय्या महाराजांनी रचलेला 'लवकर हरि यावे, मज पावे, संकट सर्व हरावे' हा पारंपरिक धावा म्हटला जातो.

देवाला नैवेद्य दाखवून आरती होते. या धाव्यात तिमय्या महाराजांनी म्हटल्याप्रमाणे वर्षोवर्षी नवरात्री उत्सवासी करवावे । नवही दिवशी नवही वहनी नवरात्री मिरवावे। अश्विन प्रतिपदेपासून देवाला विविध वाहनांवर बसवून ब्रह्मोत्सव साजरा केला जातो. अनेक सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रम होतात. धाव्यातील 'प्रथमारंभी श्री भूसहित विमान दर्शन द्यावे' या ओवीप्रमाणे व्यंकटेशांचा विमानोत्सव पुढे सुरू होणाऱ्या ब्रह्मोत्सवाची नांदी ठरतो.

## हॉटेल संस्कृतीत चर्चासत्र

**नाशिक ।** पर्यटनदिनाचे औचित्य साधून पर्यटन संचलनालय महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रिज आणि हॉटेल संस्कृती यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वा. त्र्यबकेश्वर रोडवरील हॉटेल संस्कृतीमध्ये 'पर्यटन धोरण-२०२४ आव्हाने आणि संधी' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.'पर्यटन संचलनालयाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून, पर्यटन विभागाच्या उपसंचालक मधुमती सरदेसाई, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक जगदिश चव्हाण, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीजच्या पर्यटन कमिटीचे चेअरमन दत्ता भालेराव उपस्थित राहणार आहे. चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्कृतीचे संचालक दिग्विजय मानकर यांनी केले आहे. कार्यक्रमानंतर हॉटेल संस्कृती मार्फत घेण्यात आलेल्या पैठणी महोत्सवाचा लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे.

## निर्मिती पतसंस्थेस पुरस्कार



**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. मुंबई शिर्डी येथे आयोजित एक दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबीरात निर्मिती नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित नाशिक यांना चांगले काम केल्याबाबत नाशिक विभागातुन (१० कोटी ते ५० कोटी ठेव गट) दिपस्तंभ पुरस्कार प्रथम पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम शिर्डी येथील सहकार प्रशिक्षण व संशोधन मंदिर पिंपळवाडी रोड येथे नुकताच पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणुन खासदार भाऊसाहेब वाघचौरे, काका कोयटे, कर्नाटक राज्य सहकारी फेडरेशन अध्यक्ष, नाशिक विभाग संचालिका ड.अंजली पाटील उपस्थित होते. पतसंस्था संस्थापक अध्यक्ष सुरेश गुप्ता, उपाध्यक्ष प्रताप बेडसे, संचालक संजीव बोरसे, के.डी पाटील, आनंद अग्रवाल आणि व्यवस्थापक सुदर्शन लोळगे यांनी पुरस्कार स्वीकारला.

## बांधकाम अभियंत्यांना प्लंबिंगचे धडे



**नाशिक ।** इंडियन प्लंबिंग असोसिएशनच्या नाशिक चॅप्टरद्वारे प्रशिक्षण व प्रश्नमंजुषा स्पर्धा असे स्वरूप असलेल्या इंडियन प्लंबिंग प्रोफेशनल लीग (आयपीपीएल)चे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अँड रिसर्च अकादमीचे डीन डॉ. सुनील कुटे उपस्थित होते. लीगमध्ये पुढील चार आठवडे प्रशिक्षण दिले जाईल व नंतर त्यावर आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात येईल. प्लंबिंग असोसिएशन नाशिक चॅप्टर अध्यक्ष मिलिंद शेटे, उपाध्यक्ष जयंत भिंगे, समन्वयक चिन्मय देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अनिल अरगडे, सोमनाथ क्षीरसागर आदी सदस्य प्रयत्नशील आहेत.

**सहभागी संघ :** श्रीजी डेव्हलपर्स, एबीएच डेव्हलपर्स, मयुरेश कन्स्ट्रक्शन, हर्ष कन्स्ट्रक्शन, श्रीनाथ कन्स्ट्रक्शन, एस. एम. डेव्हलपर्स, परफेक्ट बिल्डकॉन, शिवशंभू बिल्डकॉन, अशोका बिल्डकॉन, पाठक मॅनेजमेंट कन्सल्टंट, प्रकाश लड्ढा ग्रुप, श्री गणेश कन्स्ट्रक्शन, बालाजी बिल्डकॉन, शिल्पा इस्टेट्स, जानव्ही बिल्डकॉन, गायत्री बिल्डकॉन.

## गुरु गोविंद सिंग तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांचे यश



**नाशिक ।** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे अमृतवाहिनी तंत्रनिकेतन, संगमनेर येथे पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यात गुरु गोविंद सिंग तंत्रनिकेतन तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या अंजली पवार व वेदिका चंद्रात्रे या विद्यार्थ्यांनीना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. प्राचार्य श्रीहरी उपासनी, संगणक विभाग प्रमुख प्रा. गायत्री जगताप यांचे त्यांना मार्गदर्शन मिळाले.

## जैन सोशल ग्रुपचा 'तप-सरगम'



**नाशिक ।** जैन सोशल ग्रुप प्लॅटिनमच्या वतीने तप-सरगम हा कार्यक्रम ठक्कर डोम येथे पार पडला. नाशिक शहर व जिल्ह्यातील सुमारे ८ उपवास व त्यावरील ३० उपवास करणाऱ्या तपस्वींचा मानपत्र व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. यानिमित्त ऋषभ जैन व संभव जैन यांचा भाव सरगम व भावगीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी स्कायलँड बिल्डर्सचे जयेश सराफ आणि दीपा सराफ, अशोक कटारिया, यारों ग्रुप, अभय नहार, कमलेश कोठारी, कौस्तुभ मेहता, ऋषभ चोरडिया, अल्फा ग्रुप, कल्पेश भंडारी, गौरी अभिषेक ठक्कर, अ‍ॅड. राहुल कासलीवाल, यारिया ग्रुप, राहुल व अनुप लुनावत, वॉव ग्रुप, शीतल भंडारी, वर्धमान लुंकड, मनोज कासलीवाल, आकाश बाफना, रोशन खटोड, डायमंड ग्रुप, पिंकेश शहा, हंसराज कुमट आणि गौतम ललवानी यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रम यशश्वीतेसाठी जेएसजी प्लॅटिनमचे सर्व पदाधिकारी दीपेश पारख, गौतम भंडारी, पंकज पटणी, नितीन राका, अतुल जैन, संदीप लुंकड, कल्पना पटणी, सतीश हिरण, किरण खाबिया, पौर्णिमा सराफ, राहुल पारख, सम्यक सुराणा, हेमा लुंकड, यश टाटीया, गौतम भंडारी, अतुल बोहोरा, उर्विश कोठारी, प्रीतिश चोपडा, सुनील कोठारी यासह सर्व कार्यकारिणी सदस्य सर्वश्री आरती नहार, अनुप कटारिया, अनुप लुणावत, आशिष साखला, धिरज पिचा, गितेश बोरा, जितेंद्र राका, मधुरा साबद्रा, नम्रता बाफणा, निरज शहा, निलेश कोचर, प्रितम चोपडा, राहुल डुंगरवाल, सागर कुमट यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन पौर्णिमा सराफ व मनोगत दीपेश पारख व आभार गौतम भंडारी यांनी मानले. कार्यक्रमास नाशिक शहर व जिल्ह्यातून सुमारे ५ हजार जैन बांधव उपस्थित होते.


## नाशकात स्नूकर पात्रता स्पर्धा

**नाशिक । प्रतिनिधी**

निवेक क्लब येथे ३ ऑक्टोबरपासून राज्यस्तरीय स्नूकर पात्रता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रवेशाची अंतिम तारीख २८ सप्टेंबर आहे. यामध्ये १५ रेड स्नूकर आणि ६ रेड स्नूकर या स्पर्धा होणार आहेत. यामध्ये नाशिक विभागातील ६४ खेळाडूंचा सहभाग होणार आहे. या स्पर्धेमध्ये नाशिक विभागातील अव्वल ४ खेळाडूंना १० हजार आणि ७ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे.

त्याचप्रमाणे अव्वल ४ खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत. ही स्पर्धा ६ नोव्हेंबर २०२४ ला मुंबई येथे मलबार हिल क्लब येथे पार पडणार असल्याचे स्नूकर असोसिएशनचे सहसचिव देवेंद्र जोशी व सिद्धार्थ पारीख यांनी कळविले आहे. ह्या स्पर्धेच्या आयोजनासाठी बिलियर्डस अँड स्नूकर असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष चिराग रामकृष्णन, त्याचप्रमाणे निवेकचे अध्यक्ष जनक सारडा, सचिव पंकज खत्री, क्रीडा सचिव संदीप भदाणे, बिलियर्डस चेअरमन सागर विसे यांनी हि संधी उपलब्ध करून दिली आहे.

## अजिओमध्ये एच अँड एम ब्रँडचे अनावरण




**मुंबई ।** भारतातील प्रमुख फॅशन ई-टेलर अजिओने आज त्यांच्या प्लॅटफॉर्मवर एच अँड एम हा फॅशन आणि गुणवत्तेसाठी ओळखला जाणारा ब्रँडचे अनावरण केले. या भागीदारीचे उद्दिष्ट एच अँड एमची ऑनलाइन उपस्थिती वाढवणे हा आहे. भारतीय फॅशन ई-रिटेल मार्केटमध्ये त्यांची उपस्थिती मजबूत करण्याची एक उत्तम संधी मनाली जात आहे. या ब्रँडमध्ये महिला, पुरुष, लहान मुलांचे कपडे आणि होम डेकोरमध्ये १०,००० हून अधिक वस्तू उपलब्ध आहेत. ३९९ रुपयांपासून पासून सुरू होणाऱ्या किमतींसह एचअँडएम उच्च-गुणवत्तेची फॅशन नेहमीपेक्षा अधिक सुलभ बनवत असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी नायर यांनी सांगितले.

## राजश्री लॉटरीचे विजेते घोषित




**नाशिक ।** गोवा राज्य सरकारने राजश्री ५० मंथली लॉटरीचे रु.२६.५ लाख चे जॅकपॉटचे भाग्यवान विजेते घोषित केले आहेत. नवसो करबोटकर या विजेत्यांचा पणजी येथे सत्कार करण्यात आला. यावेळी नारायण गाड यांसह गोवा राज्य लॉटरीचे विविध वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून ...

## फडणवीसांचा गौप्यस्फोट

स्वयंसेवक संघाला मी सर्वकाही सांगितले आहे. आता फक्त इतरांना सांगायचे बाकी आहे. मी एवढेच सांगेन की, हे नक्की आहे की आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेतले तेव्हा आमच्या मतदारांना हे अजिबात आवडले नाही. पण आम्ही जेव्हा परिस्थिती त्यांच्यासमोर ठेवली, ते आमच्यासोबत कोणत्या परिस्थितीत आले, कोणत्या परिस्थितीत आम्ही त्यांना सोबत घेतले हे आम्ही लोकांना सांगितले तेव्हा त्यांना हे लक्षात आले की राजकारणात अनेकदा अशी स्थिती येते जेव्हा आपल्याला तडजोडी कराव्या लागतात. तुम्हाला किंवा तुमच्या लोकांना मनापासून ज्या तडजोडी करायला आवडत नाहीत, अशा तडजोडी तुम्हाला कराव्या लागतात. आम्ही तशा तडजोडी केल्या. पण आज आम्ही आमच्या १०० टक्के नाही, पण किमान ८० टक्के लोकांना समजावून देऊ शकलो आहोत की आम्ही हे का केले?

शिंदे गट व अजित पवार गटाशी युती करूनही त्यांची मतांच्या रुपात साथ लोकसभा निवडणुकीत मिळाली नाही का? याबाबत फडणवीस म्हणाले, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची मते आम्हाला जास्त मिळाली. त्या तुलनेत अजित पवारांच्या राष्ट्रवादीची मते आम्हाला कमी मिळाली. पण एक बाब लक्षात ठेवावी लागेल. हे दोन्ही पक्ष एकप्रकारे फुटून निघालेले नवीन पक्ष होते. त्यामुळे त्यांच्यासाठी ही निवडणूक त्यांचा मतदारवर्ग तयार करण्याची होती. त्यातून मते आमच्याकडे हस्तांतरित करणे कठीण काम होते. आमच्यासाठी ते कठीण काम नव्हते. आम्ही स्थिर पक्ष होतो. त्यामुळे आमची मते आम्ही त्यांच्याकडे वळवू शकलो. विधानसभेत मात्र हे होणार नाही. विधानसभेत ते नक्कीच मते आमच्याकडे वळवू शकतील.

## पुतळ्याचे डिझाईन सदोष

या पुतळ्याचे लोकार्पण करण्यात आले होते. मात्र, काही महिन्यांतच म्हणजे गेल्या महिन्यात २६ ऑगस्ट रोजी कोसळला. या घटनेने राज्यातील समस्त शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली होती. या घटनेनंतर विरोधकांनी सत्ताधारी पक्षावर जोरदार टीका केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुखमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याप्रकरणी माफी मागितली होती. या घटनेची गंभीर दखल घेत सरकारने पाच जणांची समिती नेमली होती. या समितीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना १६ पानी अहवाल सादर केला आहे.

भारतीय नौदलाचे कमोडोर पवन धिंग्रा यांच्या अध्यक्षतेखालील सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, विभागाचे माजी मुख्य अभियंता विकास रामगुडे, आयआयटी मुंबईचे प्रा. जांगिडा आणि प्रा. परिदा या पाच सदस्यीय चौकशी समितीने दुर्घटनेची कारणे अहवालात नमूद केली आहेत. राजकोट किल्ल्यावरील छपत्रती शिवाजी महाराजांचा ३५ फूट उंचीचा पुतळा हा गंज आणि कमकुवत फ्रेममुळे कोसळल्याचे अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे. ३५ फूट पुतळ्याचे वजन पेलू शकेल एवढी या पुतळ्याची फ्रेम मजबूत नव्हती, याकडे समितीने सरकारचे लक्ष वेधले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारल्यावर त्याची योग्य प्रकारे देखभाल ठेवण्यात आली नाही. देखभालीअभावी पुतळ्याला अल्पावधीतच अनेक ठिकाणी गंज लागला होता. चुकीच्या पद्धतीने या पुतळ्याचे वेल्डिंग करण्यात आले होते. पुतळ्याचे डिझाईन योग्य पद्धतीने करण्यात आलेले नव्हते, असे समितीने अहवालात म्हटले आहे. दरम्यान, पुतळ्याचे बांधकाम सदोष पद्धतीने झाल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मान्य केले आहे. आता चौकशी समितीच्या अहवालातील सूचनांनुसार दोषींवर कारवाई होईल, असेही सामंत यांनी स्पष्ट केले. दरम्यान, पोलिसांनी या दुर्घटनेप्रकरणी पुतळा उभारणारा शिल्पकार जयदीप आपटे याला अटक केली आहे.

**आदित्य ठाकरेंचे टीकास्त्र**

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा दुर्घटना प्रकरणावरून आदित्य ठाकरे यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले. शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीत झालेल्या खर्चापेक्षा उत्सवमूर्तींवर खर्च जास्त झाला होता. भाजपने गुजरातमध्ये स्टॅच्यू युनिटी पक्की बांधली. मग महाराजांचा पुतळा का कमकुवत बनवला? असा सवाल करत महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर पुतळा उभारणीच्या कामात झालेल्या भ्रष्टाचार आणि दुर्लक्षिततेची चौकशी करणार असल्याचे आदित्य ठाकरे यांनी जाहीर केले.

## मानहानी दाव्यात खा. राऊतांना कारावास

न्यायदंडाधिकारी आरती कुलकर्णी यांच्यासमोर गेली दोन वर्षे सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने राखून ठेवलेला निर्णय आज जाहीर करताना खा. राऊत यांना दोषी ठरवून १५ दिवसांचा साधा तुरूंगवास आणि २५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली. दरम्यान, न्यायालयाने खा. राऊत यांना दोषी ठरवून शिक्षा ठोठावल्यानंतर अ‍ॅड. मनोज पिंगळे यांनी या निर्णयाविरोधात अपील दाखल करण्यासाठी शिक्षेला स्थगिती देण्याची विनंती केली. न्यायदंडाधिकारी कुलकर्णी यांनी ही विनंती लगेचच मान्य केली आणि अपील दाखल करण्यास मुदत देत शिक्षेला एक महिन्याची स्थगिती देत १५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.


## प्रस्थापित थकबाकीदारांकडून वसुली करा

परिसरातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृहात पार पडली. अध्यक्षस्थानी बँकेचे प्रशासक प्रतापसिंह चव्हाण होते. सभेच्या प्रारंभीची औपचारिकता संपल्यानंतर काही मिनिटांतच ठेवीदार आक्रमक झाले. बँकेत अडकलेल्या ठेवींच्या मुद्यांवरून त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. शेतकऱ्यांनीही पीककर्जाचा व सक्तीच्या वसुलीचा प्रश्न मांडत बँकेच्या बेकायदेशीर बाबींवर नाराजी व्यक्त केली. बँक बंद असतानाही होणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराकडेही आक्रमक सभासदांनी लक्ष वेधताना थेट मंचाकडे धाव घेतली. यावेळी मुद्दा मांडण्याच्या भूमिकेमुळे मंचावर सभासदांकडून आपसात माईकची खेचाखेची झाली. तर बँकेच्या कर्मचाऱ्यांनी विषयपत्रिकेवरील विषयांचे घाईमध्ये वाचन करून सभागृहाची परवानगी घेण्याचा प्रयत्न केला असता संतप्त सभासदांनी माईक हिसकावून घेत वर्षानुवर्षे दबलेल्या भावनांना वाट करून दिली. यादरम्यान सभागृहात अनुचित घटना टाळण्यासाठी काही वेळ मंचाला पोलिसांना वेढा घालावा लागला. यावेळी माजी स्थायी समिती सभापती उद्धव निमसे, भालचंद्र पाटील, संजय तुंगार, जगदीश गोडसे, कोशिरे, सुनील केदार यांच्यासह विविध तालुक्यांमधील सभासद आक्रमक झाले. गरज नसताना बँकेने ४०० कर्मचाऱ्यांची भरती कशासाठी केली, ५० कर्मचारी घेतले असते तरी चालले असते, अशी भूमिका काही सदस्यांनी घेतली.

## मुंबई ठप्प झाली तेव्हा मुख्यमंत्री कुठे होते?

प्राथमिकता ही पहिल्यापासूनच कंत्राटदार राहिली आहे. मुख्यमंत्र्यांकडे नगरविकास खाते आहे, त्याद्वारे महापालिका प्रशासनाचा कारभार सुरू आहे. मात्र मुंबई महापालिकेत १५ सहाय्यक आयुक्त नाहीत, प्रभाग अधिकारी नाहीत. यांचेच लोक सगळीकडे भरले आहेत. मुंबई, ठाणे, पुण्याकडे लक्ष द्यायला कोणी नाही. आमचे सरकार असताना प्रशासन रस्त्यावर असायचे, ठिकठिकाणी पंप लावले जायचे. काल मात्र काहीच दिसत नव्हते, असे आदित्य ठाकरे म्हणाले. पावसाच्या इशाऱ्यामुळे पंतप्रधानांचा पुणे दौरा रद्द करण्यात आला. पण सामान्यांना जो त्रास झाला त्याचे काय? असा सवालही त्यांनी यावेळी केला.

## शब्दकोडे : ५६



**आडवे शब्द –** १) सल्ला देणारा. ३) वस्ती. ६) किंचित वाकडा. १०) टीमचा प्रमुख. ११) हित, मंगल, सुख, भले. १२) चामखीळ. १३) रणक्षेत्र. १६) जिनसांची यादी. १८) मावा. २०) माराची उमटलेली खूण. २१)उत्तराधिकारी. २३) चित्रपटाचा पडदा. २६) धातूची तार काढणारा. २७) रात्रीचा पाऊस. २८) चवदार. ३१) गडीमाणसे. ३५) थंड, गार. ३७) दारूचा एक प्रकार. ३९) मगज. ४०)आपले राष्ट्रगीत. ४४)लागून, निकट. ४५)एक गळीत धान्य. ४७) अंतरिक्ष. ४८) संतोष, आनंद. ४९) काटकसर. ५२) जेव्हा. ५४) सापाने टाकलेली त्वचा. ५५) तृप्तकरणारे जेवण. ५८) काटेरी आंबट गोड चवीचे फळ. ६०) पुरूष. ६१) नवरदेव. ६२) अवास्तव. ६४) कहाणीतील गाव. ६९) मोठीली, टोपली, हारा. ७०) गरजू. ७१) ऋण. ७२) त्वरा, जलदी. ७३) दोष, चूक, गुन्हा (हिं.)

**उभे शब्द –** १) वरचढ, श्रेष्ट. २) तूप लावून भाजलेली जाडसर पोळी. ३) रंग. ४) सामान्य. ५) कापडाचा एक प्रकार. ६) वाल्मिकी ऋषींचे पहिले नाव. ७) दणकट, मजबूत. ८) सारखा. ९) रसाळ. १०) न्यून, जास्तीच्या विरुद्ध. ११) विद्या. १४) मदनाचे एक नाव. १५) धरणीकंप. १७) माहेरी आलेली स्त्री. १९) गंध. २१) गाईचे पिल्लू. २२) लाकडी जिना. २३) अतिशयोक्ती करणे. २४) सिद्ध.२५) अतिशय कडक. २६) वडील (सं.) २९) खंदक, लांब खड्डा. ३०) राजीवलोचन.३२) लाकूड कापण्याचे दातेरी हत्यार.३३) चुनकळ्यांचे चूर्ण.३४) चांदी. ३६) अंधार (सं). ३८)घात करणारा. ४१)नीच, दुष्ट. ४२) मासा पकडण्याचे एक साधन. ४३) मुस्लिम प्रार्थना पद्धत४६)राजवाडा. ४७) शेवट, अखेर. ५०) ठरविलेला कार्यक्रम. ५१) मामाची बायको. ५३) राक्षस. ५५) किंमत. ५६) ओलसर हवा. ५७) बारदानाचा तुकडा. ५८) प्राण्यांना गिळणारा महासर्प. ५९) फळांपासून तयार केलेले पेय. ६०) नूतन. ६३) ढग.(सं). ६४) अफवा, वदंता. ६५)सांभाळणारा, एक पालेभाजी. ६६) गाव,शहर. ६७) रात्र, यामिनी. ६८)छोटे कुबड.

### शब्दकोडे५५चे उत्तर

